जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जनगणनेचा बिगुल वाजला! ऑनलाईन स्व-गणना नोंदणीसाठी १५ मे पर्यंत मुदत

नगर – देशातील जनगणना मोहिमेला वेग आला असून, पहिल्या टप्प्यातील जनगणनेसाठी अहिल्यानगर महानगरपालिका सज्ज झाली आहे. या प्रक्रियेत नागरिकांना स्वतः ऑनलाईन माहिती भरुन जनगणनेत सहभागी होता येणार आहे. या स्व–गणनेसाठी १ ते १५ मे पर्यंत मुदत देण्यात आली असून, त्यानंतर १६ मेपासून प्रगणक घरोघर येवून माहिती संकलीत करणार आहेत. नागरिकांनी प्रगणकांना सविस्तर माहिती सांगावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा असलेल्या घरांची यादी आणि घरगणना हे क्षेत्रीय कार्य महाराष्ट्र राज्यात १६ मे ते १४ जून या दरम्यान पार पडणार आहे. मात्र, प्रत्यक्ष प्रगणक घरी येण्यापूर्वी सुजाण नागरिकांना स्वतःहून माहिती भरण्याची सोय प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी https://se.census.gov.in या अधिकृत वेब पोर्टलवर जाऊन आपली माहिती नोंदवायची आहे. हे पोर्टल १ ते १५ मे या कालावधीतच खुले राहणार आहे. ऑनलाईन माहिती भरताना प्रश्नावलीत नागरिकांनी स्वतःच्या घरासंबंधी सविस्तर माहिती, पिण्याचे पाणी आणि प्रकाशाचा स्त्रोत, शौचालयाचा प्रकार आणि उपलब्धता, वाहन (दुचाकी/चारचाकी), संगणक आणि इंटरनेट सुविधा, इतर जीवनावश्यक सोयी–सुविधांची उपलब्धता असतील तर तशा नोंदी कराव्यात. नागरिकांनी स्व–गणना पर्यायाचा लाभ घेऊन पोर्टलवर अचूक माहिती भरावी आणि जबाबदार नागरिकत्वाची ओळख निर्माण करावी. या प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्याच्या वेळी वेळेची बचत होण्यास मदत होईल. अचूक माहिती भरून देशाच्या नियोजनात आणि धोरण निर्मितीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

# दगडाने ठेचून तरुणाचा केला खून, मृतदेह पोत्यात भरुन उसात फेकला

## भिंगार पोलिसांनी उलगडले बेपत्ता विद्यार्थ्याचे रहस्य; दोघांना अटक

नगर – नगर तालुक्यातील वाकोडी परिसरातील बेपत्ता तरुणाच्या गुन्ह्याची उकल करण्यात भिंगार पोलिसांना यश आले आहे. संबंधित तरुणाचा दोघांनी लाकडी दांडका व दगडाने डोके ठेचून खून करून त्याचा मृतदेह उसाच्या शेतात टाकल्याचे उघड झाले आहे. तसेच मयताची मोटारसायकल सीना नदीजवळील काटवनात सोडल्याचेही पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन तरुणांना अटक केली आहे.

२७ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास वाकोडी गावचे पोलीस पाटील यांनी पोलिसांना माहिती दिली की, वाकोडी शिवारातील दत्तात्रय गवळी यांच्या उसाच्या शेतात एक बॅग आढळून आली आहे. या बॅगेत प्रसाद रोहिदास जाधव यांचे आधारकार्ड व इतर कागदपत्रे असून त्यावर रक्ताचे डाग असल्याचे निदर्शनास आले. यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. सदर तरुणाच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असता प्रसाद जाधव हा परीक्षा देण्यासाठी गेला असून घरी परतला नसल्याची माहिती मिळाली. यापूर्वीच तो बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली होती. पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत परिसरातील व शहरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. बुरुडगाव शिवारातील फुटेजमध्ये प्रसाद जाधव याला दोन संशयित मोटारसायकलवरून नेत असल्याचे स्पष्ट झाले. गुप्त माहितीच्या आधारे पारधी वस्तीत संशयितांचा शोध घेत २९ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवित शुभम हरी भोसले (वय २०, रा. वाकोडी) व समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (रा. बुरुडगाव) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी शुभम भोसले याने दाखविलेल्या ठिकाणी पोलिसांनी शोध घेतला असता, उसाच्या शेतात पोत्यामध्ये प्रसाद जाधव यांचा मृतदेह आढळून आला. त्यावरून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, सालगुंडे, अकोलकर, सहाय्यक फौजदार सतीश भांड, रेवन्नाथ दहिफळे, पो. हे. काँ. दीपक शिंदे, मोहन भेटे, रविंद्र टकले, नंदकुमार पठारे, धर्मनाथ पालवे, रेवन्नाथ मिसाळ, रेखा पुंड, महादेव पवार, किरण बर्वे, प्रियंका भिंगारदिवे, बंडू भागवत, सुपेकर, व्यवहारे, बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, विनोद बोरगे, सुरज कदम, रमेश शिंदे, स्वाती तोडमल, वर्षा पंडित, रोहिणी दरंदले, योगिता साळवे आणि पल्लवी रोहकले यांच्या पथकाने केली.





आडते बाजारातील वाहतूकीच्या समस्यांबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन देताना व्यापारी. शेजारील दोन्ही छायाचित्रांमध्ये वाहतूकीची झालेली कोंडी.

# आडते बाजाराला ट्रॅफिकचा विळखा; अस्ताव्यस्त पार्किंगमुळे नागरिक हैराण

नगर – शहरातील आडते बाजार परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले असून, या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे. आडते बाजारात माल घेवून आलेली वाहने अस्ताव्यस्त उभी केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

याबाबत व्यापारी प्रकाश बोथरा, जितेंद्र बोथरा, पंकज गांधी, रोहित बोथरा, ईश्वर काठेड, विकास वाघ यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनात म्हटले आहे, आडते बाजार परिसरातील मुख्य रस्ता अरुंद असल्याने दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या वाहतुकीमुळे वारंवार ट्रॅफिक जामची समस्या निर्माण होत आहे. त्यातच काही दुकानांसमोर माल चढविणे–उतरण्यासाठी येणाऱ्या वाहनांची अस्ताव्यस्त पार्किंग केली जात असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. या परिस्थितीमुळे रस्त्यावर कोंडीचे प्रमाण वाढून नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच, अशा अव्यवस्थित पार्किंगमुळे अपघातांची शक्यता देखील वाढत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित प्रशासनाने अव्यवस्थित पार्किंगवर नियंत्रण ठेवून वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# लक्षवेध मल्टीस्टेटकडून ठेवीदारांची दोन कोटी ९८ लाखांची फसवणूक

## सात संचालकांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – मुदत ठेवींवर आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून लक्षवेध मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमार्फत ठेवीदारांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चास येथील शाखेसह विविध ठिकाणच्या ठेवीदारांची तब्बल २ कोटी ९८ लाख ५६ हजार ६३८ रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात सात संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी गोरख गिताराम काळे (वय ३९, रा. चास) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, निलेश शिवाजी फुंदे (रा. बोधेगाव, शेवगाव), महेश भास्कर भोर (रा. भोरवाडी), आकाश दत्तात्रय ढगे (रा. कामठी, श्रीगोंदा), प्रदीप चंद्रकांत जगताप (रा. पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा), पुनम किशोरीलाल मुथ्था (रा. केडगाव), सुभाष तुकाराम आरडे (रा. घारगाव, श्रीगोंदा) आणि विद्या वैजनाथ ढाकणे (रा. बोधेगाव) यांनी संगनमताने ही फसवणूक केल्याचा आरोप आहे.

संस्थेच्या संचालकांनी उच्च व्याजदराचे आमिष दाखवत ठेवीदारांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून घेतली. मात्र, मुदतपूर्तीनंतर ठेवी व व्याज परत करण्यास टाळाटाळ करत अखेर हात वर केल्याचे समोर आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ठेवीदारांनी पोलिसांत धाव घेतली. काळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# वाहन सोडण्यासाठी ५ हजारांची लाच घेणाऱ्या हवालदारासह कॉन्स्टेबलला रंगेहात पकडले

## पाथर्डी पोलीस ठाण्यात एसीबीचा छापा; एकाचवेळी दोघांना अटक

नगर – अपघाताच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि जप्त केलेली दुचाकी सोडण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पाथर्डी पोलीस ठाण्यातील बीट हवालदार आणि त्यांच्या मदतीला असलेल्या पोलीस कॉन्स्टेबलला नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले.

तक्रारदार यांचा ६ मार्च २०२६ रोजी मढी गावाजवळ मोटारसायकल आणि बुलेटचा अपघात झाला होता. याप्रकरणी बुलेट चालकाने २४ एप्रिल रोजी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. या गुन्ह्याचा तपास बीट हवालदार अभयसिंह काकासाहेब लबडे यांच्याकडे होता. त्यांनी २८ एप्रिल रोजी तक्रारदार यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची गाडी जमा करून घेतली होती. जमा केलेली गाडी सोडून देण्यासाठी, तसेच अपघाताच्या तपासात तक्रारदार यांच्याऐवजी दुसरा ड्रायव्हर दाखवण्यासाठी आणि न्यायालयीन कामकाजात मदत करण्यासाठी हवालदार लबडे यांनी ७ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. २९ एप्रिल रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीत लबडे यांनी तडजोडीअंती ५ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर एसीबीने पाथर्डी पोलीस ठाण्यातील बीट अंमलदार कक्षात सापळा रचला असता पोलीस हवालदार लबडे यांनी ५ हजार रुपये स्वीकारून मदतनीस पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर मारुती सानप यांच्याकडे दिली. त्याच वेळी पथकाने दोघांनाही झडप घालून ताब्यात घेतले. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक सुरेश शिरसाठ, पोलीस कॉन्स्टेबल संजय ठाकरे, पोलीस कॉन्स्टेबल योगेश शिंदे यांच्या पथकाने केली.

# रुक्मिणीबाई दुस्सा अल्प आजाराने निधन



नगर – शहरातील श्रीमती रुक्मिणीबाई बाळकृष्ण दुस्सा (वय ८७) यांचे अल्पशा आजाराने २९ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा नरसिंग दुस्सा व सून शोभा दुस्सा, नातवंडे असा परिवार आहे. जुन्या पिढीतील सत्य साई बाबा यांचे भक्त स्व. बाळकृष्ण दुस्सा यांच्या त्या पत्नी होत.

चिन्नी चुलती या नावाने त्या परिचित होत्या. सहा दशकांहून अधिक काळ त्यांनी साई सेवेत स्वतःला अर्पण केले होते.

# दशरथ शेलार यांचे अल्प आजाराने निधन



पाथर्डी – तालुक्यातील शिरापूर येथील रहिवासी दशरथ शिवाजी शेलार (वय ६०) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, मुली, भाऊ, पुतणे, सूना व नातवंडे असा परिवार आहे. ते राहुल शेलार व मयुर शेलार यांचे वडील तर गणेश तुजारे यांचे मामा होत.

# अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांच्यासह दहा जणांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर



प्रल्हाद गिते | गोविंद गोल्हार | अजय नगरे | नितीन गांगुर्डे | राजेंद्र सुद्रिक

नगर – महाराष्ट्र पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मानाच्या पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्राची घोषणा करण्यात आली आहे. सन २०२५ या वर्षासाठी अहिल्यानगरचे अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांच्यासह जिल्ह्यातील १० पोलीस अधिकारी व अंमलदारांना या बहुमानाने गौरवण्यात आले आहे. या यशाबद्दल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सर्व सन्मानितांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी या पदकांची घोषणा केली असून, गुणवत्तापूर्ण सेवा आणि शौर्याबद्दल हे सन्मान प्रदान करण्यात आले आहेत. अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते अंमलदारांपर्यंत सर्वांनी विविध विभागांत केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल राज्य स्तरावर घेतली गेल्याने जिल्हा पोलीस दलाची मान उंचावली आहे.

अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, पोलीस निरीक्षक प्रवीण पुंडलिक साळुंखे, पोलीस निरीक्षक मुक्तारखान गुलजारखान पठाण, पोलीस निरीक्षक प्रल्हाद भानुदास गीते, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद दादाबा गोल्हार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोहर नामदेव शेजवळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक अजय नारायण नगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय जबाजी खंडागळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पोपट गांगुर्डे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेंद्र आप्पासाहेब सुद्रिक यांचा या पुरस्कारांमध्ये समावेश आहे.

अहिल्यानगर पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि निष्ठेने आपली सेवा बजावली आहे. त्यांच्या या कर्तृत्वाचा राज्य स्तरावर गौरव होणे, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी व्यक्त केली.

# बदलीच्या रागातून मॅनेजरला मारहाण

नगर – एमआयडीसीतील एका कंपनीत कर्तव्यावर असलेला कर्मचारी झोपलेला आढळल्यानंतर त्याचा अहवाल वरिष्ठांना पाठविल्याच्या व वरिष्ठांनी त्यांची बदली केल्याच्या रागातून कंपनीच्या मॅनेजरला लाथाबुक्क्यांनी आणि लाकडाने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मुख्य आरोपीसह दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणी जितेंद्रकुमार हमविर सिंग यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीनुसार जितेंद्रकुमार हे नागापूर परिसरातील एका हॉटेलच्या पाठीमागे वास्तव्यास असून ते एका नामांकित कंपनीत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. कंपनीतील पेन्ट शॉपजवळ आरोपी महेश साहेबराव गायकवाड हा कर्तव्यावर असताना झोपलेला जितेंद्रकुमार यांना आढळला होता. याबाबतची माहिती त्यांनी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. या माहितीनंतर व्यवस्थापनाने शिस्तभंग केल्याप्रकरणी महेश याची बदली कंपनीच्या दुसऱ्या विभागात केली होती. आपल्या बदलीला जितेंद्रकुमार जबाबदार असल्याचा राग मनात धरून महेश गायकवाड याने आपल्या दोन साथीदारांसह जितेंद्रकुमार यांना क्लासिक व्हील कंपनीच्या समोर गाठून मारहाण केली. आरोपींनी त्यांना पाठीत लाथा मारून खाली पाडले. त्यानंतर हातातील कड्याने आणि लाकडी ठोकळ्याने त्यांच्या डोक्यावर प्रहार करत गंभीर दुखापत केली. तिघांनीही त्यांना बेदम मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर जितेंद्रकुमार यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस अंमलदार शिंदे करत आहेत.



निंबळक गावाचे ग्रामदैवत व आधारस्तंभ
।। खंडेराय प्रसन्न ।।
यात्रे निमित्त येणाऱ्या सर्व भाविक–भक्तांचे हार्दिक स्वागत..!
शुक्रवार दि. १/५/२०२६ रोजी होणाऱ्या
श्री खंडोबा महाराजांच्या
यात्रा कार्यक्रमाचे नियोजन
सकाळी ७.०० वाजता – कावड भव्य मिरवणुक कार्यक्रम
सायं. ६.०० वाजता – छबीना भव्य मिरवणुक
सायं. ८.३० वाजता – करमणुक कार्यक्रमाचे आयोजन
– सालाबाद प्रमाणे होणारे कुस्ती (हागामा) प्रेमींसाठी महत्वाची सुचना –
लामखडे परिवारातील सुजित कर्डीले हे भाचे असल्यामुळे व जगताप परिवारातील कन्या करिष्मा यांचा शनिवार दि. २/५/२०२६ रोजी, साखरपुडा व हळदी समारंभ तसेच सोमवार दि. ३/५/२०२६ रोजी शुभविवाह समारंभ होणार आहे. लामखडे परिवारातील नातलग असल्यामुळे निंबळक येथे शुभविवाह होणार असल्याने कुस्ती (हागामा) स्थगित करण्यात आला आहे.
* तरी सर्व पैलवान व कुस्ती प्रेमींनी यांची नोंद घ्यावी.
* कुस्ती हागाम्याची पुढील तारीख कळविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

# अहिल्यानगरमध्ये मटण दुकानदारावर जीवघेणा हल्ला

## मुकुंदनगर परिसरात थरार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील मुकुंदनगर परिसरात जुन्या व्यवहारातील नोटरी आणि चेक परत करण्याच्या वादातून एका मटण दुकानदारावर जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. प्रेमदान हॉटेल शेजारील बहार मटण शॉप समोर हा प्रकार घडला असून, याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अब्दुल्ला जफर शेख (वय ५२, रा. मुकुंदनगर) असे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दुकानदाराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल्ला शेख हे आपल्या दुकानावर असताना आरोपी दानिश शेख, वसीम पटेल आणि त्यांच्या एका अनोळखी साथीदाराने त्या ठिकाणी येऊन जुन्या व्यवहाराचा वाद उकरून काढला. तू माझ्यासोबत केलेली नोटरी आणि चेक मला परत दे, असे म्हणत दानिश शेख याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा वाद विकोपाला गेल्यावर दानिश शेख याने हातातील धारदार चाकूने अब्दुल्ला यांच्या मनगटावर जोरात वार केले. त्याचवेळी वसीम पटेल आणि त्याच्या साथीदाराने लाकडी दांडक्याने त्यांच्या पाठीवर व कमरेवर बेदम मारहाण केली. यात अब्दुल्ला शेख गंभीर जखमी होवून रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. आरडाओरड झाल्यामुळे नागरिक मदतीला धावून आले असता कोणी मध्ये आले तर याद राखा, जिवे मारून टाकू, अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

जखमी अब्दुल्ला शेख यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमीचा जबाब नोंदवला. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार गोरडे करत आहेत.

# भिंगारमध्ये तरुणावर लोखंडी फायटरने हल्ला

नगर – पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर लोखंडी फायटरने प्राणघातक हल्ला केल्याची घटना भिंगारमधील शुक्लेश्वर मंदिर परिसरात घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजू नरसिंग दहिहंडे (वय ३२, रा. पाटील गल्ली, भिंगार) हे मंगळवारी रात्री शुक्लेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले होते. यावेळी आरोपी श्रावण बाळासाहेब काळे (रा. महारवाडा, भिंगार) याने जुन्या वादाची कुरापत काढून फिर्यादीला गाठले. तुला खूप माज आला आहे, असे म्हणत आरोपीने फिर्यादीला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने संतापून आपल्या खिशातून लोखंडी फायटर काढले आणि फिर्यादीच्या डोक्यात जोराने प्रहार केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाला असून, आरोपीने त्याला जीवे मारण्याची धमकीही दिली. एका वर्षापूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून हा हल्ला करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. जखमी तरुणावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. या घटनेमुळे मंदिर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. राजू दहिहंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी श्रावण काळे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जे. डी. मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गारुडकर करत आहेत. रुग्णालयात जाऊन त्यांचा जबाब नोंदवला.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र रॅकेटमधील दोन एजंटांचा जामीन अर्ज फेटाळला

नगर – जिल्हा रुग्णालयातील बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळ्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपी दिलीप राजेंद्र आंधळे आणि जालिंदर ऊर्फ प्रेमकुमार अरुण वारे या दोघांचा जामीन अर्ज मुख्य प्रथमवर्ग न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यांची रवानगी पुन्हा कारागृहात करण्यात आली आहे. या रॅकेटचा पर्दाफाश झाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा गांभीर्याने तपास केला जात आहे. आतापर्यंत या गुन्ह्यात सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हे रॅकेट चालवले जात होते. धक्कादायक बाब म्हणजे, कोणत्याही प्रकारची वैद्यकीय तपासणी न करता थेट ऑनलाईन पोर्टलवर बनावट नोंदी करून ही प्रमाणपत्रे वितरीत केली जात होती. तपासादरम्यान आरोपींनी गरजू लोकांकडून ऑनलाईन स्वरूपात पैसे घेतल्याचे पुरावेही पोलिसांच्या हाती लागले आहेत.

दरम्यान पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांनी न्यायालयात सांगितले की, हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून, समाजातील खऱ्या दिव्यांगांच्या हक्कावर गदा आणणारा आहे. यात अद्याप अनेक मोठ्या नावांचा खुलासा होण्याची शक्यता आहे. अशा वेळी आरोपींना जामीन मिळाल्यास ते तपासावर प्रभाव टाकू शकतात किंवा पुरावे नष्ट करू शकतात. गणेश उगले आणि सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### असे करावे वजन कमी...

अनेकदा आपण दिवसभर डाएट करतो, जिममध्ये घाम गाळतो, तरीही वजनाचा काटा हलत नाही. याचे मुख्य कारण तुमच्या रात्रीच्या काही चुकीच्या सवयी असू शकतात. आयुर्वेद आणि आधुनिक विज्ञानानुसार, रात्रीची वेळ ही शरीराच्या चयापचय क्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची असते. जर तुम्ही झोपण्याच्या अगदी १ तास आधी जेवत असाल, तर शरीराला ते अन्न पचवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. यामुळे अन्नाचे रूपांतर ऊर्जेऐवजी चरबीत होऊ लागते. झोपण्यापूर्वी मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्ही पाहिल्याने त्यातून निघणारा 'निळा प्रकाश' शरीरातील मेलाटोनिन हार्मोनची निर्मिती रोखतो. झोप पूर्ण न झाल्यामुळे भूक वाढवणारे हार्मोन्स सक्रिय होतात आणि दुसऱ्या दिवशी तुम्ही जास्त कॅलरी खाता. जेवल्यानंतर लगेच बेडवर जाणे ही वजन वाढण्याची सर्वात मोठी चूक आहे. यामुळे खाल्लेल्या अन्नाचे पचन नीट होत नाही आणि पोटाचा घेर वाढू लागतो. जर तुम्ही रात्री उशिरापर्यंत जागता आणि ७-८ तासांची शांत झोप घेत नसाल, तर शरीराचा 'मेटाबॉलिक रेट' कमी होतो. शरीराला विश्रांती न मिळाल्यास ते फॅट बर्न करण्याऐवजी साठवून ठेवते.

## पाककला

### उरलेल्या पोळ्यांचा नाष्टा

**साहित्य :** ३-४ उरलेल्या पोळ्या, १ कांदा बारीक चिरलेला, १ टोमॅटो बारीक चिरलेला, १ हिरवी मिरची, १/२ कप उकडलेले बटाटे (मॅश केलेले), १/४ टीस्पून हळद, १/२ टीस्पून लाल तिखट, चाट मसाला / गरम मसाला, मीठ, कोथिंबीर, बटर/तेल, चीज (ऐच्छिक)

**कृती :** कढईत तेल गरम करून कांदा, मिरची, टोमॅटो परता. त्यात बटाटा, हळद, तिखट, मीठ, मसाला घाला. पोळीवर हे मिश्रण पसरवा. वर कोथिंबीर/चीज घालून रोल करा. तव्यावर बटर लावून दोन्ही बाजूंनी कुरकुरीत भाजा. तुकडे करून सॉस/चटणीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### आर्थिक चणचण रोखा...

ऊर्जेला अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. अशी श्रद्धा आहे की, आपल्या घरात उपस्थित असलेल्या प्रत्येक वस्तूत ऊर्जेचे एक अद्वितीय रूप असते, जे आपल्या जीवनावर प्रभाव टाकते. जेव्हा घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह वाहतो, तेव्हा सुख, शांती आणि समृद्धी नांदते. याउलट, नकारात्मक ऊर्जा समस्यांचे मूळ बनू शकते. म्हणूनच नेहमीच घराला सुव्यवस्थित ठेवण्याचा सल्ला देतात. घरात चांदीचे नाणे ठेवणे अत्यंत शुभ मानले जाते. चांदीचा संबंध चंद्राशी जोडलेला आहे, जो मन शांत आणि स्थिर ठेवण्यास मदत करतो. एखादे चांदीचे नाणे तिजोरीत, लॉकरमध्ये किंवा तुम्ही जिथे पैसे साठवून ठेवता त्या विशिष्ट ठिकाणी ठेवल्यास तुमची आर्थिक स्थिती बळकट होण्यास मदत होते.

## सौंदर्य

केसांचे अति गळणे. ही समस्या विशेषतः एप्रिल आणि मे महिन्यांत अधिकच गंभीर होते. लोक अनेकदा सामान्य मानतात. केसांची योग्य काळजी घेतल्यास केस गळणे टाळता येते. सौम्य शॅम्पू लावणे, तेल लावणे आणि टाळूची मालिश केल्याने केस मजबूत होतात आणि केस गळणे कमी होते. तीव्र उष्णता आणि घामापासून बाहेर जाताना आपले केस झाका. टोपी किंवा स्कार्फ वापरल्याने तुमच्या केसांचे थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षण होईल.

## सल्ला

डोश्याचे पीठ खूप पातळ झाले असेल, तर त्यात १-२ चमचे रवा किंवा तांदळाचे पीठ घाला आणि ते १०-१५ मिनिटे तसेच ठेवा. यामुळे पाणी शोषले जाईल आणि पीठ घट्ट होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १ मे २०२६

**महाराष्ट्रदिन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, स्वाती २८।३५, सूर्योदय ०६ वा. २४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** तुमची ऊर्जा पुन्हा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या कारण अशक्तपणामुळे तुमचे मन कमकुवत होते.

**वृषभ :** तुमची खरी क्षमता ओळखा. अन्यथा तुम्ही शक्ती नाही तर इच्छा गमावून बसाल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

**मिथुन :** आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे

**कर्क :** तुमच्या हातातून पैसे हरवू देऊ नका. आजच्या दिवशी आपल्या कुंटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करणे ही तुमची प्राथमिकता असेल.

**सिंह :** आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**कन्या :** आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**तूळ :** एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल. तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल.

**वृश्चिक :** सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल.

**धनु :** आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल.

**मकर :** आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पना आणि तुम्ही केलेल्या कृती यामुळे तुम्हाला अपनेक्षीत फायदा होईल.

**कुंभ :** आज तुम्हाला जाणीव होईल, की लग्नाच्या वेळी जी वचनं दिली होती, ती सगळी खरी होती, तुमचा/तुमची जोडीदार ही खरंच सोलमेट आहे.

**मीन :** स्वप्नील चिंता सोडून द्या आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्या. आनंद, समाधान आणि व्यवसाय दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या ठेवा.

## फिल्मीचक्कर क्र. १२३४ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) या अभिनेत्रीने इमारतीवरून उडी टाकून दिला जीव ६) एक प्रसिद्ध दिवंगत निर्माता-दिग्दर्शक - +++++ देसाई ९) बडे ++ (चित्रपटाचे नाव) ११) करिश्मा कपूरचे घरातील टोपणनाव १२) 'एक दूजे के लिये' चित्रपटातील एक अभिनेत्री १३) सुनील दत्त, विमी; मदन पुरी, राजकुमार, मुमताज, बलराज सहानी यांचा एक गाजलेला चित्रपट १५) नया दिन ++ ++ (चित्रपटाचे नाव) १६) ++ हिन्दुस्तानी (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** २) एक प्रसिद्ध दिवंगत गीतकार - पंडित भरत ++ ३) जुन्या काळातील एक अभिनेत्री ४) ++ बहुरानीयाँ (चित्रपटाचे नाव) ५) राजेश खन्ना, आशा पारेख, विनोद खन्ना यांचा एक गाजलेला चित्रपट ७) आँसू बन गये ++ (चित्रपटाचे नाव) ८) 'दबंग, बॉडी गार्ड, एक था टायगर' आदी चित्रपटांचा नायक ९) पाताल +++ (चित्रपटाचे नाव) १०) ++ ++दम मेरे दोस्त (चित्रपटाचे नाव) १४) ++ गाँव मेरा देश (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जीवनात जर समाधानी राहू इच्छित असाल तर श्रेय घेण्याच्या इच्छेचा त्याग करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नारळाच्या शेंड्यांचा वापर कशासाठी केला जातो?

भारतीय संस्कृतीत नारळाचा वापर फक्त खाणे-पिणे किंवा पूजा करण्यापुरता मर्यादित नाही, तर त्याच्या प्रत्येक भागाचे स्वतःचे महत्त्व आणि उपयोग आहे. तसेच विशेष म्हणजे नारळाच्या शेंड्या ज्या निरूपयोगी म्हणून टाकून दिल्या जातात. तर त्याचा देखील उपयोग करता येतो. नारळाच्या शेंडीमध्ये अनेक उपयुक्त गुणधर्म लपलेले असतात. चला तर नारळाच्या शेंडीचे उपयोग जाणून घ्या.

नैसर्गिक इंधन म्हणून उपयोगी

कोरडे नारळाचे शेंड्या हे एक उत्कृष्ट नैसर्गिक इंधन आहे. ते लवकर आग धरते आणि ते बराच काळ जळत राहते. ग्रामीण भागात ते स्वयंपाक आणि धूप यासाठी वापरले जाते. सेंद्रिय खत बनवण्यात उपयोगी

नारळाच्या कवचाचा वापर कुजून किंवा बारीक करून खत म्हणून करता येतो. ते जमिनीत ओलावा टिकवून ठेवते आणि वनस्पतींच्या वाढीस मदत करते. बागकामासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. सजावटीच्या वस्तू

नारळाच्या कवचापासून सुंदर हस्तकला, सजावटीच्या वस्तू आणि अगदी भांडी देखील बनवल्या जातात. हे पर्यावरणपूरक आहे आणि स्थानिक कारागिरांना रोजगार देखील देते.

घरगुती स्क्रबर म्हणून उपयोग

वाळलेल्या नारळाच्या शेंड्यांचा तंतुमय भाग भांडी स्वच्छ करण्यासाठी स्क्रबर म्हणून वापरता येतो. ते प्लास्टिकच्या स्क्रबरपेक्षा अधिक टिकाऊ आणि नैसर्गिक आहे. सौंदर्य आणि त्वचेची काळजी घेण्यासाठी उपयोगी

नारळाच्या शेंड्यांत नैसर्गिक फायबर असते जे मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यास मदत करते. तसेच ते वापरताना काळजी घेतली पाहिजे जेणेकरून त्वचेला कोणतेही नुकसान होणार नाही.

### कर्जाचे ओझे

एकदा, आर्थिक संकटात सापडल्यावर तेनालीरामाने राजा कृष्णदेवराय यांच्याकडून काही पैसे उसने घेतले. काळ लोटला आणि पैसे परत करण्याची वेळ जवळ आली. पण तेनालीकडे पैसे परत करण्याचे कोणतेही साधन नव्हते, म्हणून त्याने ते परतफेड टाळण्यासाठी एक योजना आखली.

एके दिवशी, राजाला तेनालीरामाच्या पत्नीकडून एक पत्र मिळाले. त्या पत्रात लिहिले होते की तेनालीरामा खूप आजारी आहे.

तेनालीरामा अनेक दिवसांपासून दरबारात आला नव्हता, म्हणून राजाने स्वतः जाऊन तेनालीला भेटायचे ठरवले. राजाला असाही संशय होता की तेनालीरामा कर्ज चुकवण्यासाठी काहीतरी योजना आखत असावा.

राजा तेनालीरामाच्या घरी पोहोचला. तिथे, तेनालीरामा पलंगावर घोंगडी पांघरून झोपला होता. त्याची अवस्था पाहून राजाने त्याच्या पत्नीला कारण विचारले.

ती म्हणाली, 'महाराज, तुम्ही दिलेल्या कर्जाच्या ओझ्याने त्याचे मन जड झाले आहे. ही चिंता त्याला आतून पोखरत आहे आणि कदाचित त्यामुळेच तो आजारी आहे.'

राजाने तेनालीचे सांत्वन केले आणि म्हणाला, 'तेनाली, काळजी करू नकोस.' 'माझे कर्ज फेडण्याचे तुझ्यावर बंधन नाही. काळजी करणे थांबव आणि लवकर बरा हो.'

हे ऐकून तेनालीरामा पलंगावरून खाली उडी मारून हसला, 'धन्यवाद, महाराज.'

'हे काय आहे, तेनाली? याचा अर्थ असा की तू आजारी नव्हतास? माझ्याशी खोटे बोलण्याची तुझी हिम्मत कशी झाली?' राजा रागाने म्हणाला.

'नाही, नाही, महाराज, मी तुमच्याशी खोटे बोललो नाही. मी कर्जामुळे आजारी होतो. तुम्ही मला कर्जातून मुक्त करताच, माझ्या सर्व चिंता नाहीशा झाल्या आणि कर्जाचे ओझे उतरले. हे ओझे गेल्याने माझा आजारही नाहीसा झाला आणि मला बरे वाटू लागले. आता, तुमच्या आदेशानुसार, मी मुक्त, निरोगी आणि आनंदी आहे.' नेहमीप्रमाणे, राजाला तेनालीच्या योजनेवर तो हसला.

## जीवन का अमृत (भाग १)



सहायक होती है। कठिनाईयाँ और मुश्किलें आ सकती हैं, पर वे बिना कोई धब्बा छोड़े खत्म हो जाती हैं। कृपया आप निराश न हों।

२८. पिछले साल प्रकाशित पुस्तक Crown of Life (योग: एक तुलनात्मक अध्ययन) रूहानियत का खजाना है, जो कि आत्मा के विज्ञान के हर पक्ष पर रोशनी डालती है। बहुत से प्रिय भाई-बहनों ने इससे फायदा उठाया है और इसकी महान कीमत को समझा है।

२५. धन्य हैं वे लोग, जिन्हें सतगुरु अपने पवित्र मिशन में कुछ सेवा करने का मौका देता है, चाहे वह एक छोटी सेवा ही क्यों न हो। सतगुरु उन सभी की कद्र करता है, जो उसका कार्य करते हैं।

### मुश्किलें हो गई खत्म

२६. उतार-चढ़ाव आते रहते हैं। घने से घने काले बादलों में भी आशा की किरण होती है। हम हमेशा हर वस्तु के बेहतर पक्ष की ओर देखें। कठिनाईयों से कई अच्छी और जरूरी शिक्षाएँ मिलती हैं। ये वास्तव में सहायक होती हैं।

* * *

२७. मुझे दक्षिण अफ्रिका में आपके प्यारे भाई के गुजर जाने पर अफसोस हुआ। यह प्रभु की इच्छा थी। हममें से हर एक को अपनी-अपनी बारी से यह भौतिक संसार छोड़ना होगा। पर आपको यह जानकर खुश होना चाहिए कि दयालु गुरु-शक्ति नामलेवाओं के नजदीकी रिश्तेदारों को, प्रभु की इच्छा के तहत हर संभव दया और संरक्षण प्रदान करती है ।

हमें मिली यह भौतिक जिंदगी एक सुनहरी मौका है और हमें इसका पूरा फायदा उठाना चाहिए। सांसारिक भोगों-रसों में लिप्त रहना खिलौनों से खेलने जैसा है।

***

२९. इंसान संपूर्ण सृष्टि में सर्वोच्च है। उसकी महानता इस बात में है कि वह महाचेतनता में जाकर मिल सकता है, जिसका कि वह एक अंश है। आत्मा का जागृत होकर उच्चतर चेतनता में प्रवेश करना इंसानी जीवन का एक जरूरी हिस्सा है और बिना यह प्राप्त किए इसकी महानता नष्ट हो जाती है। यह ना तो रस्म-रिवाज है और ना ही मत-मतांतर या हठधर्मी है। बल्कि वास्तव में उच्चतर मंडलों में चढ़ाई करना है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : हो, तुम्हाला दोन्हींतला फरक माहीत आहे. तुम्हाला काही काळजी असेल तर उपाय शोधणं, हा तिचा केंद्रबिंदू असायला हवा.

ध्यान आणि चिंतन - मला स्वतःला बघायचं आहे... मी, एक आत्मा, माझ्या मनाचा आणि शरीराचा मालक आहे... फक्त एवढंच माझ्या नियंत्रणात आहे... हे सोडून बाहेरचं सगळं - लोक, परिस्थिती... काहीच माझ्या नियंत्रणात नाही... आज माझ्या नियंत्रणात काय आहे आणि काय नाही याबद्दल मी सजग आहे... मी माझी ऊर्जा वाचवतो आणि माझी शक्ती राखून ठेवतो... मी इतरांना दोष देत नाही, त्यांना बदलायचा प्रयत्न करत नाही किंवा तशी इच्छाही ठेवत नाही... मी माझी शक्ती कमी करत नाही... मी काय बदलू शकतो याकडे मी आज लक्ष देणार आहे... काय बदलू शकत नाही याकडे नाही... या समजेसह मी तक्रार करत नाही... पुढच्या चोवीस तासांपर्यंत कोणाबद्दल तक्रार नाही आणि कोणावर टीका नाही... ओम शांती!

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

### ध्यान आणि चिंतन

जर आपण स्वतःवर टीका केली किंवा स्वतःचा तिरस्कार केला तर त्यामुळे आपण आपल्या प्रेम करण्याच्या ऊर्जेत अडथळा आणतो. सगळ्यांना प्रेम देण्यासाठी आपल्या आत प्रेम असणं गरजेचं आहे आणि त्यासाठी आपण स्वतःवर प्रेम करायला हवं. आपल्या तरंगांपासून लोक त्यांचा बचाव करू शकतात पण आपण त्यांचा अनुभव सतत घेत राहतो. आपली स्पंदनं म्हणजे तोच सुगंध आहे ज्याच्या बरोबर आपण राहतो.

लोकांचे आपल्याप्रति असणारे विचार, शब्द आणि कृती हे आपल्याला मिळालेल्या गिफ्टसारखे आहेत. आपण त्या गिफ्टचं काय करायचं ही संपूर्णपणे आपली निवड आहे. लोक आपल्यावर टीका करू शकतात पण आपण टीकेचा वापर स्वतःचं खच्चीकरण करण्यासाठी किंवा स्वतःला प्रेरणा देण्यासाठी करू शकतो.

तक्रार केल्याने आपली ऊर्जा कमी होते कारण आपल्या नियंत्रणात नसणाऱ्या गोष्टींचा आपण विचार करतो. तक्रार करण्याचा अर्थ, समस्येवर लक्ष केंद्रित करणं. परंतु आपण उपाय शोधण्यावर लक्ष केंद्रित करायला हवं.

मनाची नव्याने आखणी

सुरेश ओबेरॉय : इतरांना दोष देण्याचा आणि सतत तक्रार करण्याचा संस्कार आपल्यात इतका खोलवर रुजला आहे की आपण आपली सजगता गमावली आहे. आणि आपल्याला वाटतं की आपण आपल्या कामामुळे किंवा कर्तव्य निभावण्यामुळे थकून जातो.

शिवानीदीदी : तुम्ही या सवयीची शिकार झाला होता याची जाणीव तुम्हाला कशी झाली? याचं कारण म्हणजे आज तुम्ही स्वत:कडे लक्ष दिलं. आपली बॅटरी पूर्वीपण डिस्चार्ज होत होती पण आपल्याला हे जाणवलं नाही किंवा आपण त्यामागचं कारण शोधलं नाही.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

इतिहास साक्षी आहे - की आजपर्यंत झालेल्या सर्व युद्धात तेलाचे साठे उडवले, लष्करी तळ उडवले, विमानतळ उडवले पण दारुचे अड्डे कोणीच नाही उडवलेले 'पित रहा सुरक्षित रहा'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* यंदाच्या रणजी करंडक स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू कोण?

- हर्ष दुबे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

५) पायांना भेगा पडल्या असतील, तर काजूचे तेल लावून पायात मोजे घालावेत. काही दिवसांतच भेगा नाहीशा होतात.

६) काजू पित्तकर असल्याने तो नेहमी अंजीर, बदाम व मनुका यासोबत खाल्ल्याने उष्णतेचे विकार होत नाहीत.

८) काजूमध्ये 'ब' जीवनसत्त्व जास्त प्रमाणात असल्याने भूक मंद झाली असेल, तर रोज सकाळी अर्धा कप दुधातून चार-पाच काजू बारीक करून घ्यावेत. यामुळे अग्नी प्रदीप्त होऊन भूक लागते.

थकवा व नैराश्य आल्यास नियमित काजूसेवन करावे, यामुळे मज्जासंस्था उत्तेजित होऊन शरीर कार्यक्षम बनते.

९) रक्ताची कमतरता झाली असेल, तर रोज चार ते पाच काजूचे सेवन करावे. यामध्ये लोह भरपूर प्रमाणात असल्याने रक्त वाढण्यास मदत होते.

१०) वृद्धत्व टाळून चिरतारुण्य टिकविण्यासाठी व शरीर काटक व प्रमाणबद्ध करण्यासाठी काजूचे सेवन नियमितपणे करावे.

सावधानता :

काजू हे उष्णगुणात्मक असल्याने अगदी (चार ते पाच) प्रमाणातच खावेत, जास्त प्रमाणात खाल्लयास उष्णतेचे विकार होण्याची शक्यता असते. तसेच त्यात मेदाम्ले अधिक असल्याने अति प्रमाणात खाल्लयास अपचन होऊन वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते. म्हणून मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब, आंत्रव्रण, आम्लपित्त या तक्रारी असलेल्यांनी काजू जास्त प्रमाणात खाऊ नयेत.

### पिस्ता

सुकामेव्यामध्ये वापरला जाणारा पिस्ता सर्वांनाच परिचित आहे. पिस्ता हे छोट्या आकाराचे चविष्ट व कठीण कवचाचे पौष्टिक फळ आहे. त्याचे कवच टणक, परंतु द्विदल असते. पिस्त्याच्या गरावर एक साल असते. त्याच्या आतील गराचा रंग हिरवट पिवळा असतो. पिस्त्याचे झाड आकाराने खूप मोठे व डौलदार असते.

त्याच्या फांद्या समांतर व सर्व बाजूंनी सारख्या असून, पानांनी बरहलेल्या असतात. पिस्त्याची झाडे इराण, अफगाणिस्तान, फ्रान्स, अमेरिका, तुर्कस्तान या भागामध्ये जास्त आढळतात. पिस्त्याला मराठीत 'पिस्ता, हिंदीमध्ये 'पिस्ता', संस्कृतमध्ये 'म्युकुलका' किंवा 'निकोचक', इंग्रजीमध्ये 'पिस्ताचिओ नट' व शास्त्रीय भाषेत 'पिस्तासिया व्हेरा' (Pistacia Vera) या नावाने ओळखले जाते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# मोफत कायदेविषयक मदत केंद्रामुळे सर्वसामान्यांना न्याय मिळवणे सुलभ

**न्या. योगेश पैठणकर यांचा विश्वास**



सीएसआरडीमध्ये मोफत कायदेविषयक मदत केंद्राचे उद्घाटन करताना न्यायाधीश योगेश पैठणकर आदी.

## सीएसआरडीमध्ये मोफत कायदेविषयक मदत केंद्राचे उद्घाटन

नगर – न्याय हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सीएसआरडीतील या मोफत कायदेविषयक मदत चिकित्सालयाच्या माध्यमातून दुर्बल व वंचित घटकांना कायदेशीर मार्गदर्शन, सल्ला आणि सहाय्य सहज उपलब्ध होईल. यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण होऊन न्यायप्रवेश अधिक प्रभावी आणि सुलभ होईल. असा विश्वास कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले न्यायाधीश योगेश पैठणकर यांनी व्यक्त केला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्या अंतर्गत मुंबई येथील इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांच्या सहयोगाने तसेच बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर द्वारे संचलित मोफत कायदेविषयक मदत चिकित्सालयाचे उद्घाटन नुकतेच सीएसआरडीमध्ये पार पडले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश योगेश पैठणकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तर बीपीएचई सोसायटीचे सचिव विशाल बार्नबस हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर इंटरनॅशनल जस्टिस मिशनच्या अधिवक्ता अ‍ॅड. हॅलिना थोरात, वरिष्ठ सहयोगी निलेश छडीदार व सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास महिला, बालक व दुर्बल घटकांच्या कार्यरत असणारे विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी, संस्थां व संघटनाचे प्रतिनिधी, तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

विशाल बार्नबस यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात संस्थेच्या सामाजिक बांधिलकीवर प्रकाश टाकताना सांगितले की, समाजपरिवर्तनासाठी बीपीएचई सोसायटीद्वारे संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष कृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. आणि हा उपक्रम त्याच दिशेने उचललेले आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

अ‍ॅड. हॅलिना थोरात यांनी आपल्या मनोगतात कायदेविषयक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, कायद्याचे ज्ञान हेच सशक्तीकरणाचे प्रभावी साधन आहे. त्यांनी असंघटित कामगारांसाठी अशा केंद्रांची आवश्यकता अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. सुरेश पठारे यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, मोफत कायदेविषयक मदत केंद्र हे केवळ सेवा देणारे केंद्र नसून, ते सामाजिक न्याय आणि जनजागृतीचे एक प्रभावी व्यासपीठ असणार आहे, यासाठी सर्वच यंत्रणांचा संवाद व समन्वय गरजेचा असणार आहे. समाजातील वंचित, दुर्बल आणि न्यायप्रवेशापासून दूर असलेल्या घटकांना सुलभ व मोफत कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, यामुळे न्यायप्रवेश अधिक व्यापक आणि प्रभावी होणार असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

यावेळी एम.एस.डब्ल्यू. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गरज मूल्यांकन अहवालातून समाजातील विविध घटकांना भेडसावणाऱ्या कायदेविषयक समस्यांचे वास्तव चित्र समोर आले. या अहवालामुळे या केंद्राच्या कार्याची दिशा निश्चित होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. वैशाली पठारे यांनी आभार मानले. सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ.जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, डॉ.प्रदीप जारे, आसावरी झपके, नाजीम बागवान, ट्विंकल ईश्वरी तसेच विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## निसर्गनिर्मित सौंदर्य व माणसाची सर्जनशीलता

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

विश्वाची निर्मिती हा परमात्म्याच्या सर्जनशक्तिचा आविष्कार आहे. सर्जनशक्ती ही परमात्म्याबरोबरच माणसाच्याही ठिकाणी आहे. खरेतर, सर्जनशक्ती ही परमात्म्याने मानवाला दिलेली फार मोठी देणगी आहे. तिचा योग्य उपयोग केल्यास माणूसच देवत्वापर्यंत पोचू शकतो. माणूस आपल्यातील असामान्य सर्जनशक्तिने आणि रसिकतेने असे काही नवे निर्माण करू शकतो की ती जणू त्याची प्रतिसृष्टीच असते. गुरुदेव रवींद्रनाथांनी म्हटले आहे, 'माणसाची सर्जनशक्ती ईश्वराच्या सर्जनशक्तिशी तुलना करता अल्प असली तरी तो आपली कल्पकता, विचार आणि कौशल्य यांचा उपयोग करून आपल्या कलाकृती घडवत असतो. त्यातून स्वतः अभिव्यक्त होत असतो.'

खरेतर जगातील निसर्गसौंदर्याची रहस्ये प्रकट करण्यासाठीच कलावंत जन्म घेत असतो. कला आणि कलाकार याविषयी लोकजीवनात आदराची आणि कुतूहलाची भावना असते. अनेक कलांचा आस्वाद घेताना आपण थक्क होऊन जातो. तसेच त्या कलेच्या सुंदरतेविषयी कलाकाराला मनोमन धन्यवाद देत असतो. शिल्प, चित्र, नृत्य, संगीत, साहित्य यासारख्या कलांमधून समृद्ध मानवी मनाचे उत्कट दर्शन घडते आणि स्वाभाविक वास्तवाला सुंदरतेने नटविले जाते. प्रत्येक कलाकार हा आपल्या कृतीतून आपली अनुभूतीच प्रकट करीत असतो.

कला ही नवनिर्मिती होय. नवनिर्मिती म्हणजे दुसरे–तिसरे काही नसून आपल्या स्मृतीत साठवून ठेवलेल्या प्रतिमांची नवी मांडणी, नवी रचना होय. परमात्म्याने सुंदर विश्व निर्माण केले. फुले, तारका, वनश्री, इंद्रधनुष्य, पाने, फुलपाखरांचे पंख, आकाशाच्या विविध छटा यातून विधात्याने सृष्टीत रंग भरला. विविध आकार निर्माण केले. पशू–पक्ष्यांच्या आवाजातून सुंदर स्वर दिले आणि हे निसर्गनिर्मित सौंदर्य हेच कलावंताचे खरे आकर्षण ठरले. निसर्गनिर्मित या सौंदर्यवृत्तीच्या कुतूहलातून माणसाने काही निर्मिती केली आणि मानवनिर्मित सौंदर्यकृती उभ्या राहिल्या, निसर्गातील सुसंगती, सुरेखता, सुबंध पाहून निसर्गाकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी आली. सौंदर्यप्रधान सृष्टी, सौंदर्यग्राही भावना आणि रसास्वादवृत्ती असल्यास माणूस स्वतःशी सृष्टी उभी करतो आणि त्यात आनंदाचा नाद घुमवितो. निसर्गातील वस्तू आणि घटना यांचा अर्थ देखील सौंदर्यामधून कळतो तर सत्य आणि शिव यांचाही साक्षात्कार सौंदर्यातच घडतो. रसिकतेने विश्वाचे सौंदर्य अनुभवणे याच्याइतका मोठा आनंद तो कोणता ?

– किशोर गांधी



राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूसमवेत प्राचार्य पी.डी.भाबड व प्रशिक्षक जाधव सर, विशाल पगारे

# अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या ३ खेळाडूंची राज्यस्तरीय बास्केटबॉलसाठी निवड

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना आयोजित ५१ वी राज्यस्तरीय स्पर्धा ३ ते ७ मे रोजी सातारा येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी १३ वर्षाच्या वयोगटात नगर जिल्हा संघात अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे ३ खेळाडू निवडले गेले आहेत. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये तनिष्का बाराहाते, कस्तुरी झेंडे, ओवी औटी यांचा समावेश आहे.

शाळेचे प्रशिक्षक जाधव सर, विशाल पगारे, दिशान गांधी यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा लाभली आहे.

शाळेचे प्राचार्य पी.डी.भाबड यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांच्या पुढील स्पर्धात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. ते म्हणाले की अशा उत्कृष्ट कामगिरीमुळे शाळेचा आणि स्थानिक समाजाचा अभिमान वाढला आहे आणि शाळा या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी पाठबळ देईल.

# सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्तीच यशाची गुरुकिल्ली

**अमित रत्नपारखी यांचे प्रतिपादन**



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत रिदम 2K26 पारितोषिक वितरण करण्यात आले. (छाया – विजय मते)

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत रिदम 2K26 पारितोषिक वितरण

नगर – यश मिळवण्यासाठी सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्ती अत्यंत महत्त्वाची आहे. अभियांत्रिकी शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष जीवनात त्याचा उपयोग करून नवकल्पना करण्यावर भर द्यावा, असे अमित रत्नपारखी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. त्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी कौशल्यविकास तांत्रिक ज्ञान आणि संवाद कौशल्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशाला घाबरू नका, तर त्यातून शिकून पुढे जाण्याचा सल्ला दिला.

विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित 'रिदम 2K26' या वार्षिक कार्यक्रमातील पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून अ‍ॅड. वसंतराव कापरे उपस्थित होते, तर मुख्य अतिथी म्हणून अमित रत्नपारखी (मेकॅनिकल, बॅच १९९४) यांची विशेष उपस्थिती लाभली.

अमित रत्नपारखी सध्या स्टरलाइट टेक्नॉलॉजिस लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथे ग्लोबल प्रोक्योरमेंट हेड म्हणून कार्यरत असून त्यांना ३० वर्षांहून अधिक औद्योगिक अनुभव आहे. त्यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमास पाहुणे म्हणून प्रवीण म्हस्के आणि संदीप चंगेडे यांची उपस्थिती लाभली. प्रवीण म्हस्के (बॅच २००१) हे Infosys मध्ये प्रिन्सिपल डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत असून त्यांना २४ वर्षांचा अनुभव आहे. ते डेटा सायन्स आणि मशीन लर्निंग क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.

संदीप चंगेडे (बॅच १९९३) हे सिस्कॉन कॅम्पुटर सिस्टीम, पुणे यांच्याशी संलग्न यशस्वी उद्योजक आहेत.

या प्रसंगी डॉ. पी.एम. गायकवाड, सेक्रेटरी जनरल विखे पाटील फाउंडेशन चे प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.आर.आर. नवथर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यात अ‍ॅकॅडमिक प्राइजेस, स्पोर्ट्स प्राइजेस, आर्ट एक्झिबिशन, पद्मश्री करंडक इत्यादींचा समावेश होता. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्नेहसंमेलन समन्वयक प्रा. सुनील मांढरे तसेच या कार्यक्रमासाठी डॉ.संदीप उदावंत, प्रा. पंकज औताडे, डॉ.कानिफ मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.




महापालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

# महापालिकेचे आरोग्य केंद्र झोपडपट्टीतील नागरिकांसाठी आधार

**विकास उडाणशिवे यांचे प्रतिपादन, रामवाडी येथील आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी**

नगर – अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी आणि जुनी झोपडपट्टी म्हणून ओळख असलेल्या रामवाडी परिसरात आरोग्य सुविधांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. येथे प्रमुख्याने कचरा वेचक, कष्टकरी कामगार व रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, या नागरिकांसाठी आरोग्य सेवा पूर्वी मोठे आव्हान होते. मात्र त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेचे निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी केले.

महापालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. पुढे बोलताना उडाणशिवे म्हणाले की, महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र आज अनेक गरजूंसाठी जीवनदान देण्याचे कार्य करत आहे. या केंद्रामध्ये सामान्य तपासणी, औषधोपचार, लसीकरण तसेच विविध आरोग्य सुविधा उपलब्ध होत असल्याने परिसरातील नागरिकांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या शिबिरामध्ये डॉ. अभिषेक शिंदे व डॉ. आनंद बोजा यांनी ४० कचरा वेचक कामगारांची नेत्र तपासणी केली. त्यापैकी १५ कचरा वेचक कामगारांची मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. या उपक्रमासाठी रामवाडी आरोग्य केंद्राच्या स्टाफ नर्स रोहिणी बोरुडे तसेच सहसेविका नीता उडानशिवे आणि देविदास पोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या विशेष सहकार्यामुळे रामवाडी येथे हे आरोग्य केंद्र उभारण्यात आले. आज कचरा वेचक तसेच अन्य कामगारांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हे आयुक्त डांगे यांच्या संवेदनशील निर्णयामुळेच शक्य झाले. शहराच्या इतर भागातील आरोग्य केंद्रात १० रुपये घेतले जातात, परंतु रामवाडी केंद्रावर विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याने आयुक्तांचे आभार मानण्यात आले. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने या सामाजिक व आरोग्यदायी उपक्रमाचे स्वागत करण्यात आले असून, समाजातील कष्टकरी व वंचित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार' अहिल्यानगर येथील सरोज आल्हाट यांना प्रदान

**पुणे येथे राष्ट्रीय पातळीवरील सन्मानाने गौरव; सामाजिक व साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल**



कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना भारत सरकारच्या नीती आयोग संलग्नित डॉ. मणिमाई देसाई प्रतिष्ठान व आरोग्य सेवा संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

नगर – येथील कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना भारत सरकारच्या नीती आयोग संलग्नित डॉ. मणिमाई देसाई प्रतिष्ठान व आरोग्य सेवा संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना त्यांच्या बहुआयामी योगदानाबद्दल देण्यात आला आहे.



पुणे येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खादी व ग्रामोद्योग मंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते आल्हाट यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले की, साहित्य, समाजसेवा, पत्रकारिता तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सरोज आल्हाट यांनी अनेक वर्षे सातत्याने केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील या पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याचे स्पष्ट केले.

सरोज आल्हाट या केवळ कवयित्री म्हणूनच नव्हे, तर सामाजिक प्रश्नांवर लेखन व जनजागृती करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणूनही ओळखल्या जातात. रुग्णसेवा देखील त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय असून त्यांनी महिलांविषयक, शिक्षण आणि समाजजागृती विषयांवर प्रभावी काम केले या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यापूर्वीही त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# केंद्रीय विद्यालय प्रादेशिक क्रीडा संमेलन स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंची कामगिरी

नगर – केंद्रीय विद्यालय संघटन, मुंबई प्रदेशतर्फे ५५व्या प्रादेशिक टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा २२ एप्रिल रोजी NDA, खडकवासला, पुणे येथे पार पडल्या. या स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस अ‍ॅकॅडमीच्या मुलांनी उत्तम कामगिरी करत १ सुवर्ण, १ रजत आणि १ रौप्य पदके पटकावली. १७ वर्ष वयोगटात संघ प्रकारात वेदांत शितोळे आणि निधीश भंडारे यांच्या संघाने सुवर्ण पदक जिंकले. तसेच एकेरी मुलाच्या गटात वेदांत शितोळे याने रजत पदक व निधीश भंडारे याने कांस्य पदक जिंकले. विजयी खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत अहिल्यानगर, मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, ठाणे आणि नाशिक या जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत हर्ष फुंदे याने उत्कृष्ट खेळ केला. स्मॅश अकॅडमीच्या सर्व खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून प्रेक्षकांची मने जिंकली.

# एकाच ऊर्जेचे शुभ आणि अशुभ असे दोन प्रकार कसे?

संपूर्ण विश्वात जी ऊर्जा आहे ती निर्गुण, निराकारी आहे. तिला वासही नाही आणि चवही नाही. त्या ऊर्जेचा अनुभव आपल्याला आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांच्या माध्यमातून येतो. या ऊर्जेला ती निर्गुण आणि निराकार असल्यामुळे शुभाशुभत्व असे स्वतःचे नाही. आपण दिशांच्या माध्यमातून आपल्या बांधकामाच्या म्हणजेच आपल्या वास्तुच्या माध्यमातून ही ऊर्जा कशी वळवतो आणि कशी आंगिकारतो यावर बरेच काही अवलंबून आहे. ऊर्जेच्या उत्पत्तीपासून आपल्यापर्यंत येईपर्यंत ऊर्जेवर चंद्र–सूर्य भ्रमण, ग्रह गोलांचे दाब, वातावरणातील सतत होणारे बदल, त्याचे आपण दिशेच्या माध्यमातून केलेला योग्य किंवा अयोग्य असा स्विकार आणि पुढे आयुष्यात होणाऱ्या घटना, यावरुन त्या ऊर्जेची गुणात्मकता ठरवता येते. या गुणात्मकतेलाच सर्वसामान्यपणे शुभ किंवा अशुभ संबोधतात. मात्र मुळ ऊर्जेचे स्वरुप हे निर्गुण आणि निराकार आहे.

नळाला रोज पाणि येते. हेच पाणी आपण आपल्या भवनांत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या उपयोगासाठी वापरतो. बाजारात मिळणाऱ्या फिल्टरमधून फिल्टर करुन वापरतं, तर कोणी नुसतं गाळून वापरतात, तर कोणी उकळून वगैरे घेतात तर काहीजण जसेच्या तसे वापरतात. म्हणजे पाणी एकच आहे मात्र ज्याला जसे सहन होईल तसे प्रत्येकजण प्रक्रिया करुन घेतो.

ऊर्जेचेही तसेच आहे. मुळ ऊर्जा एकाच प्रकारची आहे पण दिशांच्या माध्यमातून, बांधकामाच्या अनुषंगाने त्याचे परिणाम बदलताना आपल्याला अनुभवता येतात.

वास्तुशास्त्रात दिशांच्या रुपातून आणि पंचमहाभूतात्मक परिणामांच्या माध्यमातून या ऊर्जेचा उपयोग अखिल मनुष्य जातीच्या उद्धारासाठी, या प्रक्रियात्मक ऊर्जेचा वैश्विक ऊर्जेबरोबर सांगड घालत मनुष्यजीवन अनुकुल, ऊर्जात्मक गतिमान आणि प्रगतशिल करण्याचा वास्तुशास्त्राचा मुळ हेतू आहे.

वास्तुशास्त्रिय संस्कार हा त्या बांधकामातल्या दोषांमुळे आपल्या वास्तुत तयार झालेला ऊर्जेचा पिळ सोडवायचे काम करते. या संस्कारात विविध रत्न तसेच धातू वापरुन अनुकुलता साधण्यासाठी प्रयत्न केला जातो.

रत्न म्हणजे खरंतर ऐकप्रकारे दगडच. पण या दगडात नैसर्गिक वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या काही ऊर्जात्मक गुणधर्मामुळे या दगडालाच रत्न म्हंटलं जाते. या दगडावर पैलू पाडून सूर्याच्या ऊर्जेचा मनुष्याला आवश्यक असलेल्या जिवनदायी ऊर्जेमधे परावर्तन करण्याचे आणि संरक्षणात्मक कवच प्राप्त करुन देण्याचे प्रमुख काम हे रत्नांचेच. तर धातूच्या माध्यमातून अनावश्यक ऊर्जेचे नियमन अभिप्रेत आहे. म्हणजेच रत्नांच्या अन्वये नैसर्गिक ऊर्जेचे प्रदक्षिणा मार्गाने संक्रमण तर धातूच्या माध्यमातून संक्रमित आणि नैसर्गिक ऊर्जेचे नियमन करुन मनुष्यजीवन अनुकुल करणे, ऊर्जाशील करणे हाच वास्तुशास्त्राचा मुळ हेतू आहे.

नैसर्गिक ऊर्जेचे अनुकुलत्व साधण्यासाठी दिशा, पंचतत्व आणि मनुष्य यांची सांगड घालता येणे आवश्यक आहे. म्हणजेच माणसाच्या मनातील ऊर्जेच्या शुभाशुभत्वातली गल्लत होणार नाही.

– **कौस्तुभ काळे,** वास्तुवाचस्पति, अहिल्यानगर. मो. ९८५०९४१८८१

# राष्ट्र सेविका समितीतर्फे १ मे रोजी 'विजयघोष' कार्यक्रमाचे आयोजन




नगर - राष्ट्र सेविका समिती ही एक अखिल भारतीय स्त्री संघटना आहे. वं. मावशी केळकर ह्यांनी १९३६ साली स्थापन केलेली ही संघटना विविध आयामांच्या माध्यमातून भारतभर विस्तारली आहे. विविध उपक्रमातून महिला व मुलींचा व्यक्तिमत्व विकास करून, त्यांचा उपयोग राष्ट्रकार्यात करणे हा या संघटनेच्या कामाचा उद्देश आहे. समितीच्या या शिस्तबद्ध अविरत प्रवासाला यावर्षी ९० वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवपूर्ण कार्याचा महोत्सव साजरा करण्यासाठी १ मे रोजी 'विजयघोष' या विशेष घोषवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'घोषवादन' हा समिती सेविकांचा 'अभिमान बिंदू' आहे.

पश्चिम महाराष्ट्र प्रांतात कोल्हापूर, अहिल्यानगरसह पुण्यात दोन ठिकाणी एकाच दिवशी, एकाच वेळी, एकाच क्रमाने सादरीकरण हे विजयघोष' कार्यक्रमाच्या आयोजनाचे वैशिष्ट्य आहे.

अहिल्यानगर येथे आयोजित घोषवादन कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मुळच्या नगरच्या असलेल्या गायिका 'अपूर्वा निषाद' यांची उपस्थिती असणार आहे. प्रमुख वक्त्या समितीच्या अखिल भारतीय सहघोष प्रमुख प्राचीताई पाटील येणार आहेत.

या घोषवादनासाठी अहिल्यानगर उत्तर, दक्षिण तसेच नाशिक शहर, मालेगाव आणि नासिक ग्रामीणच्या सर्व तालुक्यातून घोषवादक महिला व मुली येणार असून प्रत्येक जिल्ह्याचे स्वतंत्र वादन आणि नंतर सर्व जिल्हे मिळून एकत्रित वादन सादर करणार आहेत.

अहिल्यानगरमध्ये प्रथमच होणाऱ्या या विलोभनीय सादरीकरण सोहळ्यास नगरकरांची उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा कार्यवाहिका प्रणाली कुलकर्णी ह्यांनी केले आहे. कार्यक्रमाचे स्थान व वेळ १ मे, वेळ : सायंकाळी ५-३० ते ७-३०, ठिकाण : रेणाविकर विद्यालय, वैदू वाडी, सावेडीनाका, अहिल्यानगर

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम नागरिकांच्या सन्मानाचा भक्कम पाया

## अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांचे प्रतिपादन, जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन उत्साहात साजरा

नगर - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या सन्मानाचा व त्यांच्या हक्कांचा भक्कम पाया असून या कायद्यामुळे शासनाच्या सेवा नागरिकांना हक्काने मिळण्याची हमी मिळाली आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी हिंगे म्हणाले, विविध विभागांच्या शेकडो सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्या निश्चित कालावधीत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. 'आपले सरकार' पोर्टलमुळे अनेक सेवा घरबसल्या उपलब्ध झाल्या असून शासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी झाले आहे. जिल्ह्यात या सेवांच्या अंमलबजावणीत महसूल विभाग आघाडीवर असून सेवा अत्यंत जलदगतीने दिल्या जात आहेत. ते पुढे म्हणाले, कायद्याच्या मूळ उद्देशानुसार जिल्ह्यातील विविध विभागांनी प्रभावी अंमलबजावणी केली आहे. आगामी काळात या सेवांचा अधिक विस्तार होणार असून नागरिकांना अधिक जलद आणि कार्यक्षम सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल. अधिसूचित सेवांबरोबरच इतर सेवांमध्येही अनेक अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे, असे त्यांनी सांगितले.



जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते आदी.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले, सेवा ही केवळ जबाबदारी नसून ती आपली बांधिलकी आहे. प्रत्येक अर्जामागे नागरिकांचा विश्वास आणि अपेक्षा दडलेल्या असतात. त्यामुळे नागरिकांना केंद्रबिंदू मानून त्यांना वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे आवश्यक आहे. नागरिकांनीही या कायद्याचा प्रभावी वापर करून आपल्या हक्कांची जाणीव ठेवावी आणि आवश्यकतेनुसार अपील प्रक्रियेचा उपयोग करून न्याय मिळवावा. ते पुढे म्हणाले, या कायद्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्तरदायित्व असून सेवा देण्यात झालेल्या विलंबाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर दंडाची तरतूद आहे. त्यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि पारदर्शक झाले आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग 'आपली सेवा, आमचे कर्तव्य' या ब्रीदवाक्याद्वारे नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, अरुण उंडे, माणिक आहेर तसेच तहसीलदार उद्धव नाईक, अमोल मोरे, आकाश दहाडदे, धीरज मांजरे आणि रवी सतवन यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. तसेच रोहित शिंदे, संतोष खैरनार व रविंद्र मांगुळकर यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली, तर सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागूल यांनी केले.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा 'राज्यस्तरीय सन्मान'

## अभिप्राय कक्षामुळे पारदर्शक प्रशासनाची नवी दिशा



जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर जिल्ह्यात १ जुलै २०२५ पासून 'अभिप्राय कक्ष' उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

नगर - सुस्पष्ट दृष्टी, प्रभावी अंमलबजावणी आणि जनसेवेसाठी असलेली कटिबद्धता यांतून साकारलेला 'अभिप्राय कक्ष' हा उपक्रम प्रशासनातील पारदर्शकता व उत्तरदायित्व वृद्धिंगत करणारा ठरला आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. जिल्ह्यासाठी ही अत्यंत भूषणावह बाब ठरली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर जिल्ह्यात १ जुलै २०२५ पासून 'अभिप्राय कक्ष' उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. नागरिकांना सेवा देताना पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. 'आपले सरकार' सेवा केंद्रांतून लाभ घेतलेल्या प्रत्येक नागरिकाशी थेट संपर्क साधून त्यांचा अभिप्राय नोंदविला जातो. प्राप्त अभिप्रायाचा गांभीर्याने विचार करून आवश्यक असलेल्या प्रकरणांवर तत्काळ कार्यवाही केली जाते.

या उपक्रमामुळे प्रशासन अधिक सजग, उत्तरदायी व कार्यक्षम बनत आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत १ लाख ५० हजार नागरिकांशी थेट संपर्क साधण्यात आला असून, प्राप्त झालेल्या ४९४ तक्रारींपैकी ३३३ तक्रारींचे यशस्वी निराकरण करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांना सेवा अधिक जलद, पारदर्शक व सुलभ पद्धतीने पुरविल्या जात आहेत.

विश्वास, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा संगम असलेला 'अभिप्राय कक्ष' हा उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यात प्रशासकीय कार्यक्षमतेचा नवा मापदंड ठरत आहे. हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही अनुकरणीय आदर्श ठरू शकतो, हेच या राज्यस्तरीय सन्मानातून अधोरेखित होते.

# डॉ. हर्षवर्धन तन्वर व मुग्धा तन्वर यांना 'स्वरानंद सेवार्थ सन्मान पुरस्कार' प्रदान

नगर - सातळकर लोटस हॉस्पीटलच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष रुग्ण सेवा करणाऱ्या डॉ. हर्षवर्धन व मुग्धा तन्वर यांना संपूर्ण स्वरानंद बहूउद्देशीय संस्था तर्फे स्वरानंद सेवार्थ सन्मान पुरस्कार संजय जाधव व महेश खोपटीकर यांच्या हस्ते संपूर्ण स्वरानंद संगीत महोत्सवात प्रदान करण्यात आला.



डॉ. हर्षवर्धन व मुग्धा तन्वर यांना संपूर्ण स्वरानंद बहूउद्देशीय संस्था तर्फे स्वरानंद सेवार्थ सन्मान पुरस्कार संजय जाधव व महेश खोपटीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. तन्वर हे सातळकर लोटस हॉस्पीटलच्या माध्यमातून रुग्ण सेवा करत आहेत त्याच बरोबर अध्यात्म, सांस्कृतिक काम करणाऱ्या अनेक संस्थांना ते मदत करतात, अहिल्यानगर शहरात पहिले रोबोटिक सर्जरी सेंटर सुरू करणारे डॉ. तन्वर दाम्पत्य असून शहरवासीयांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. या रोबोटिक सर्जरी सेंटर मुळे आता रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पुणे मुंबई सारख्या शहरात जायची गरज पडणार नाही व पैसे व वेळ दोन्हीही वाचेल तसेच आम्ही शक्य तेवढ्या अल्प दरात रुग्णांना याचा लाभ मिळवून देऊ असे प्रतिपादन डॉ. तन्वर यांनी आपल्या भाषणात केले, त्याच बरोबर सध्या सुरू असलेल्या तांत्रिक जगातील अडचणी व फायदे याचाही विचार मांडला. जीवनात संगीत किती महत्वाचे आहे व पुढील काळात साताळकर हॉस्पिटल मध्ये खोपटीकर सर यांच्या माध्यमातून म्यूजिक थेरेपी सुरू करणार असून त्याचा फायदा घ्यावा असे आवाहन केले.

# नगरमध्ये ३ मे रोजी 'उपमहापौर धनंजय जाधव चषक' जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा



नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आली असून ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी खुली आहे. उपमहापौरांनी महापालिकेमध्ये केलेल्या धडाकेबाज कामगिरीला सलाम म्हणून ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

ही स्पर्धा ३ मे रोजी सकाळी ९.३० वाजता नगर येथील गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे सुरू होणार आहे. स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा

## विजयी झालेल्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. अंतिम निकालानुसार प्रत्येकी २ मुले व २ मुली राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी संघटनेमार्फत भरली जाणार असून राहण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना उपमहापौर धनंजय जाधव करंडक देऊन गौरविण्यात येणार आहे.

ही स्पर्धा १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेल्या (१९ वर्षांखालील) खेळाडूंसाठी खुली असून सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी सोबत आणणे आवश्यक आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश ऑनलाइन किंवा व्हॉट्सॲपद्वारे स्वीकारले जात असून नोंदणीची अंतिम मुदत २ मे रोजी सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत आहे.

अधिक माहिती व नोंदणीसाठी यशवंत बापट (९३२६०९२५०१), पारूनाथ ढोकळे (९८५०७०४२६८), मनीष जसवानी (८८५५००२३३२), प्रशांत धंगेकर (९९२१३७७९८८), देवेंद्र ढोकळे (८७००४१२६३३) व चेतन कड (७२७६६७८८९३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर नोंदणी करावी : https://forms.gle/9Vxmik1irvbkcwwTA. अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी नेत्रालयामध्ये ३ मे रोजी मोफत 'तिरळेपणा उपचार व बाल नेत्रतपासणी शिबिर'

नगर - आनंदऋषीजी नेत्रालय येथे ३ मे रोजी मोफत तिरळेपणा उपचार व बाल नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आनंदऋषीजी नेत्रालय, सक्कर चौक, अहिल्यानगर येथे होणार आहे. आजच्या काळात मोबाईल, टॅब व टीव्हीचा वाढलेला वापर (स्क्रीन टाईम) आणि कमी झालेला मैदानी खेळ यामुळे मुलांमध्ये मायोपिया (जवळचा नंबर वाढणे), डोळे दुखणे, पाणी येणे, डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, या समस्या वेळेत ओळखल्या नाहीत तर मुलांच्या शिक्षणावर आणि विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लहान वयातच डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे.



डॉ. निरंजन पेहेरे

या शिबिरात बाल नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. निरंजन पेहेरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी व उपचार करणार आहेत. डॉ. पेहेरे हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, गेल्या १६ वर्षांपासून एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट येथे कार्यरत आहेत. त्यांनी आफ्रिका, युरोप व अमेरिका येथेही काम केले असून तिरळेपणा उपचारात विशेष प्रावीण्य मिळवले आहे. त्यांनी आतापर्यंत शेकडो रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

नेत्रालयात रेटिना, कॉर्निया, ग्लुकोमा व बाल नेत्ररोग अशा सर्व सुपर-स्पेशालिटी सेवा उपलब्ध आहेत. संस्थेने आतापर्यंत १.२५ लाखांहून अधिक नेत्रशस्त्रक्रिया केल्या असून दररोज ८० ते १०० शस्त्रक्रिया केल्या जातात. येथे ५ अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, वेब कॅमेरा मॉनिटरिंग, तसेच पूर्णवेळ ॲनेस्थेटिस्ट व फिजिशियन सुविधा उपलब्ध आहेत.

याशिवाय २० पेक्षा अधिक व्हिजन सेंटर्स, टेलिमेडिसिन सुविधा, अत्याधुनिक तारकपूर सेंटर, कौन्सिलिंग टीम, ऑप्टिकल विभाग व रुग्णांसाठी अन्न व्यवस्था उपलब्ध आहे. पात्र रुग्णांना आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अंतर्गत मोफत उपचार दिले जाणार आहेत.

तज्ज्ञांनी पालकांना आवाहन केले आहे की, मुलांचा स्क्रीन टाइम मर्यादित ठेवावा, बाहेर खेळण्यास प्रोत्साहन द्यावे आणि वर्षातून किमान एकदा डोळ्यांची तपासणी करून घ्यावी. या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५.

# प्रा. प्रसाद जमदाडे यांना संपूर्ण स्वरानंद गौरव पुरस्कार

नगर - संपूर्ण स्वरानंद बहूउद्देशीय संस्था अहिल्यानगर आयोजित संपूर्ण स्वरानंद संगीत महोत्सवाच्या निमित्ताने, केडगाव स्थित ज्ञानसाधना गुरुकुलच्या माध्यमातून समाजातील, तळागाळातील अनेक गोर-गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना, गेली अनेक वर्षे विद्या प्रदान करणाऱ्या प्रा.प्रसाद जमदाडे यांना संपूर्ण स्वरानंद गौरव पुरस्काराने संजय जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



संपूर्ण स्वरानंद बहूउद्देशीय संस्थेच्यावतीने प्रा.प्रसाद जमदाडे यांना संपूर्ण स्वरानंद गौरव पुरस्काराने संजय जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रसाद जमदाडे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांच्या गुरुकुल शिक्षण पद्धतीने अनेक विद्यार्थी घडत आहेत. प्रसाद सरांनी अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांचे पालकत्व घेऊन त्यांना मोफत शिक्षणाची सोय केलेली आहे. सरांचे ज्ञानसाधना गुरुकुल हे प्रायमरी ते माध्यमिक पर्यंतच्या विद्यार्थ्यांना फक्त शालेय शिक्षणच नाही तर संस्कार, मानवता, सामाजिक कर्तृत्व, अध्यात्म, संगीत, व्यक्तिमत्व विकास याचे देखील शिक्षण देणारे नगर जिल्ह्यातील एकमेव गुरुकुल आहे असे म्हणायला हरकत नाही. ज्ञानसाधना गुरुकुल मध्ये ७५० विद्यार्थी शिक्षण घेत असून प्रसाद जमदाडे हे स्वतः जातीने विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी कार्य करीत आहेत. संपूर्ण स्वरानंद बहूउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष महेश खोपटीकर व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# अंबिका प्राथमिक विद्यालय केडगावची राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत उत्तुंग भरारी



नगर - सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये अंबिका प्राथमिक विद्यालय केडगावचे विद्यार्थ्यांनी राज्यात, जिल्ह्यात व केंद्रात उत्तुंग यश संपादन करून विद्यालयाचे नाव उच्च स्थानी ठेवण्यात विद्यार्थ्यांना यश आले. यामध्ये स्वराज स्वप्नील परांडे, प्रणिती दीपक कोतकर, ओवी मंगेश गाडेकर, सांगळे त्रिशा, अर्णव दारकुंडे, भोसले मंजिरी महेश, गिरवले वेदांती शत्रुघ्न आदी विद्यार्थ्यांनी राज्यात व जिल्ह्यात यश मिळविले. त्याबद्दल शाळेचे प्राचार्य बोडखे सर, उपप्राचार्य मुरुमकर सर व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका गोरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या विद्यार्थ्यांना प्रा. झरेकर मॅडम व विद्यार्थ्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# इंटरनॅशनल ब्रँडमुळे नगरच्या खाद्यसंस्कृतीला नवा आयाम मिळेल

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर - आपले नगर शहर बदलत असून अधुनिकतेकडे वेगाने वाटचाल करत आहे. त्यामुळे नवनवीन इंटरनॅशनल ब्रँडस् आता अहिल्यानगरमध्ये येत आहे. सावेडी उपनगर आता पुण्याच्या धर्तीवर विकसित होतं असल्याने नागरिकांना चांगल्या सुविधा मिळत आहेत. बॉम्बे कुल्फी या इंटरनॅशनल ब्रँडचे आईस्क्रिम नगरमध्ये उपलब्ध झाल्याने नगरच्या खाद्यसंस्कृतीला नवा आयाम मिळेल, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

बॉम्बे कुल्फी या ब्रँडचे आईस्क्रिम आता अहिल्यानगरमध्ये उपलब्ध झाले असून, या गुलमोहर रस्त्यावर आम्रपाली गार्डन जवळ नवीन आउटलेटचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते व महापौर ज्योती गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखील वारे, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ॲड.अशोक कोठारी, रमेश कोठारी आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.



बॉम्बे कुल्फी या इंटरनॅशनल ब्रँड आईसक्रिमच्या दालनाचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप व महापौर ज्योती गाडे. समवेत हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, प्रशांत नहार

## बॉम्बे कुल्फी या इंटरनॅशनल ब्रँडचे आईस्क्रिम नगरमध्ये उपलब्ध

प्रशांत नहार म्हणाले, हा ब्रँड पारंपरिक भारतीय कुल्फीला आधुनिक स्वरूप देत देश-विदेशात विस्तारलेला आहे. कुल्फी मध्ये उच्च दर्जाच्या शुद्ध दूध व नैसर्गिक घटकांपासून तयार केलेल्या विविध फ्लेवर्सच्या कुल्फी, आईसक्रिम, फालुदा व शेक्स उपलब्ध आहेत. देशभरात मोठमोठ्या शहरांमध्ये आउटलेट्स असलेला हा ब्रँड आता अहिल्यानगरमध्येही उपलब्ध झाल्याने ग्राहकांना 'अस्सल कुल्फी'चा आस्वाद घेता येणार आहे.



भोसले आखाडा येथे महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या चार माजली राजमाता जिजाऊ भोसले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या कामाची पहाणी डॉ.सुजय विखे व आ.संग्राम जगताप यांनी केली. समवेत आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महेश लोंढे, रोहन सानप, अभिजित बोरुडे, मनपा आरोग्याधिकारी डॉ.सतीश राजूरकर, शहर अभियंता पारखी आदींसह अधिकारी व पदाधिकारी. (छायाचित्र : लहू दळवी)

# राजमाता जिजाऊ भोसले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल हे राज्यातील महानगरपालिकांमधील सर्वात उत्कृष्ट ठरेल

## डॉ.सुजय विखे व आ.संग्राम जगताप यांनी केली कामाची पाहणी

नगर – आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगर शहराची वेगाने विकासात्मक प्रगती होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे पूर्ण ताकदीने आ.जगताप यांच्या मागे उभे आहेत. महानगरपालिकेच्या जिजामाता भोसले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलचे कामही जवळपास पूर्ण झाले आहे. उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांनी यासाठी निधी दिला. या रुग्णालयाच्या उभारणीसाठी गणेश भोसले यांनी भरपूर मेहनत घेतली आहे. शहरमध्ये गोरगरीब गरजू रुग्णांना मोफत चांगल्या दर्जेदार अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्यात या उद्देशाने उभारण्यात आलेले हे राजमाता जिजाऊ भोसले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल राज्यातील महानगरपालिकांमधील सर्वात उत्कृष्ट हॉस्पिटल ठरेल, असा विश्वास भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे यांनी व्यक्त केले.

भोसले आखाडा येथे महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या चार माजली हॉस्पिटलच्या कामाची पहाणी डॉ.सुजय विखे व आ.संग्राम जगताप यांनी केली. यावेळी डॉ.विखे यांनी विविध सूचना केल्या. यावेळी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महेश लोंढे, रोहन सानप, अभिजित बोरुडे, मनपा आरोग्याधिकारी डॉ.सतीश राजूरकर, शहर अभियंता पारखी आदींसह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगर महानगरपालिकेचे स्वमालकीचे मोठे अद्ययावत हॉस्पिटल व्हावे ही बऱ्याच वर्षांपासूनची इच्छा होती ती आता पूर्णत्वास येत आहे. या हॉस्पिटलच्या उर्वरित कामासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मोठे सहकार्य केले आहे. डॉ.सुजय विखे यांनी या कामाची पाहणी करून काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत. लवकरच या हॉस्पिटलचे लोकार्पण होईल. येत्या १ मे ला महाराष्ट्रदिनी शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते होणार आहेत.

यामध्ये चितळे रोड नेहरू मार्केटचे भूमिपूजन, सावेडी बसस्थानकचे भूमिपूजन, तारकपूर रस्त्यावरील पथदिव्यांचे उद्घाटन, तसेच हरितनगर प्रकल्पा अंतर्गत व्रुक्षारोपण आदी महत्वाचे कामे होणार आहेत.

यावेळी डॉ.सतीश राजूरकर यांनी हॉस्पिटल मध्ये असणाऱ्या विविध अद्ययावत सुविधांची सविस्तर माहिती देताना सांगितले, महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या चार माजली राजमाता जिजाऊ भोसले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये १२५ बेड, चार ऑपरेशन थिएटर, आयसीयू, एनआयसीयू, बालरुग्णांसाठी स्वतंत्र ऑपरेशन थिएटर, ८ ओपीडी विभाग, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, ईसीजी, पॅथॉलॉजी लॅब, कॅन्टीन, मेडिकल स्टोअर, कॉन्फरन्स हॉल, स्पेशल रूम्स, तसेच प्रशस्त पार्किंगची व्यवस्था आहे.

सुभाष गांधी, परेश, अक्षय व पावन गांधी यांनी स्वागत केले.

# माहेश्वरी युवक मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी अमित खटोड तर सचिवपदी पियुष झंवर





नगर – श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर यांच्या वर्ष २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यात अध्यक्षपदी अमित खटोड यांची तर सचिवपदी पियुष झंवर यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्ष अमित खटोड, उपाध्यक्षपदी पवन बंग, सचिव पियुष झंवर, खजिनदारपदी सी. ए. मनीष नावंदर तर सहसचिवपदी प्रतीक सारडा यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधणे, सी. ए. अनिकेत बलदवा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, मधुर बिहानी आणि गोविंदा काकाणी यांचा समावेश करण्यात आला आहे.

यासोबतच मंडळाने विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वतंत्र समित्यांचीही घोषणा केली आहे. खेळ समितीमध्ये आदित्य काकाणी व भूषण काबरा, आरोग्य समितीमध्ये अभिनंदन कलानी व वेदांत बजाज, तर सांस्कृतिक समितीमध्ये सी. ए. प्रणव बिहाणी, यश खटोड व ऋषि बजाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, आरोग्य व सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

अध्यक्ष अमित खटोड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, माहेश्वरी युवक मंडळ हे केवळ एक संघटन नसून युवकांच्या उन्नतीसाठी कार्य करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे. आगामी काळात सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, रोजगार, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्याचा आमचा मानस आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने मंडळाला अधिक उंचीवर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सचिव पियुष झंवर यांनीही आपल्या भाषणात सांगितले की, युवकांच्या समस्या ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करणे ही आमची प्राथमिकता असेल. खेळ, आरोग्य आणि सांस्कृतिक या तिन्ही क्षेत्रांत संतुलित विकास साधण्यासाठी विविध स्पर्धा, शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम राबवले जातील. मंडळाच्या प्रत्येक सदस्याला सहभागी करून घेण्यावर आमचा भर राहील.

उपाध्यक्ष पवन बंग यांनी आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेवर भर देत सांगितले की, मंडळाच्या निधीचा योग्य वापर करून अधिकाधिक उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न असेल. आर्थिक नियोजन मजबूत ठेवत सामाजिक कार्यात सातत्य राखणे हे आमचे उद्दिष्ट आहे. सर्व सदस्यांचा विश्वास कायम राखत कार्य पार पाडले जाईल.






# एशियन नोबल हॉस्पिटल येथे १ ते १५ मे दरम्यान मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन




डॉ. मधुरा घुमरे

नगर – येथील एशियन नोबल हॉस्पिटल येथे महाराष्ट्र दिनानिमित्त मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १ ते १५ मे या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत हे तपासणी शिबिर होणार आहे. स्त्री रोग तज्ज्ञ, वंध्यत्व निवारण स्पेशालिस्ट तसेच लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. मधुरा घुमरे शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

एशियन नोबल हॉस्पिटल येथे महिलांच्या समस्यांवरील अत्याधुनिक तपासण्या आणि उपचार सुविधा उपलब्ध आहेत. ॲडव्हान्स गायनॅक केअर सेंटर येथे कार्यरत आहे. गर्भधारणा न होणे, अवेळी मासिक पाळी येणे, पाळीत पोट दुखणे, कमी/जास्त रक्तस्त्राव होणे, गर्भाशयाला सूज असणे तसेच वारंवार रक्तस्त्राव होणे, वारंवार गर्भधारणा होऊनही गर्भपात होणे, ३५ वर्षांवरील किंवा त्याखालील जोडपी यांनी प्रयत्न करूनही गर्भधारणा न होणे, अनियमित मासिक पाळी तसेच हार्मोन्स समस्या, गर्भाशयाच्या गाठी, स्तनांच्या गाठी, अंडाशयाच्या गाठी, अंग बाहेर येणे, पांढरे जाणे अशा विविध आरोग्य समस्यांची तपासणी व उपचार मार्गदर्शन या शिबिरात केले जाणार आहे.

शिबिरात मोफत ओपीडी सल्ला आणि सवलतीच्या दरात उपचार केले जातील. सर्व प्रकारच्या स्त्री रोगावरील निदान, उपचार तसेच शस्त्रक्रियांसाठी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१-२४२१२९२/ २४२१९११/१२.











# 'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक १ मे रोजी 'राष्ट्रीय जनलोक क्रांती ग्रंथ' घोषित होणार

## पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदची घोषणा; हुतात्मा स्मारकात कार्यक्रम



नगर – पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविणाऱ्या गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाला महाराष्ट्र दिनी १ मे रोजी 'राष्ट्रीय जनलोक क्रांती ग्रंथ' म्हणून घोषित करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

या घोषणेचा कार्यक्रम शहरातील हुतात्मा स्मारक येथे सकाळी १०:३० वाजता पार पडणार असून, यावेळी या ग्रंथाचे महत्त्व आणि त्यातील विचार जनतेसमोर मांडले जाणार आहेत. संबंधित ग्रंथ हा केवळ ऐतिहासिक माहितीपुरता मर्यादित नसून, तो शासनशास्त्राचा जिवंत दस्तऐवज असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

या ग्रंथामध्ये शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची मांडणी 'शून्य-जात मावळा स्वराज्य' या संकल्पनेतून करण्यात आली आहे. जातविहीन, कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श या माध्यमातून अधोरेखित केला आहे. सत्ता नव्हे, तर लोककल्याण आणि न्याय हे केंद्रस्थानी ठेवून उभारलेले स्वराज्य हेच या विचारांचे मूळ असल्याचे सांगण्यात आले.

तसेच, हा ग्रंथ भारतापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक ठरू शकतो, असा दावा करण्यात आला आहे. लोकशाहीतील आंतरिक स्वातंत्र्य आणि गुलामगिरीविरुद्ध बौद्धिक लढा कसा द्यावा, याचे मार्गदर्शन या पुस्तकातून मिळते, असे ॲड. गवळी यांनी नमूद केले.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ राजकीय नव्हते, तर ते सर्वसामान्यांचे सर्वोच्च राज्य होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. सध्याच्या जात, अंधश्रद्धा आणि भीतीवर आधारित व्यवस्थेला उत्तर देण्यासाठी या ग्रंथातील विचार महत्त्वाचे ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमातून इतिहास नव्याने समजून घेण्याची गरज अधोरेखित करण्यात आली असून, जग बदलायचे असेल तर इतिहास नव्याने समजून घ्यावा लागेल, असा संदेश संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाला 'राष्ट्रीय जनलोक क्रांती ग्रंथ' म्हणून घोषित करण्यासाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, जालिंदर बोरुडे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर क्रीडा कार्यालयाच्या वतीने खेळाडूंसाठी २० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिर

## ४ मे रोजी उद्घाटन, खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभागी व्हावे



नगर – अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील खेळाडूंसाठी २० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी खेळासाठी दोन टप्प्यात सदर प्रशिक्षण शिबिर होणार असून, पहिला टप्पा ४ ते १३ मे आणि दुसरा टप्पा १८ ते २७ मे दरम्यान होणार आहे. यामध्ये अधिकाधिक खेळाडूंनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन खेळाडूंची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी, तसेच शहरी व गावपातळीवर चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी ८ ते १४ वयोगटातील व वरिष्ठ गटात सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत शिबिराचे आयोजन केले आहे. खो-खो खेळाचे शिबिर बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर व आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार आहे. बॅडमिंटन व कबड्डी खेळासाठी जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे शिबिर होईल. संभाजीराजे कुस्ती केंद्र सावेडी, तालुका क्रीडा संकुल बुऱ्हाणनगर येथे कुस्तीचे शिबिर होणार आहे.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिरात खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवावा. प्रशिक्षण शिबिराच्या अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# शशिकांत मुनोत यांच्या संग्रहातील प्रारंभिक दुर्मिळ नाणे



पुणे – महाराष्ट्र राज्याच्या स्थापने निमित्त १ मे १९६० रोजी राज्य सरकारतर्फे जारी करण्यात आलेले एक प्रासंगिक व दुर्मिळ नाणे पुणे येथील शशिकांत मुनोत यांच्या संग्रहात जतन केलेले आहे. या नाण्याच्या एका बाजूवर समई दर्शविण्यात आली असून तिच्यावर सात ज्योती प्रज्वलित आहेत. समईच्या दोन्ही बाजूंना कमळाच्या प्रतिकृती कोरलेल्या आहेत. समईजवळ छत्रपती शिवरायांच्या मुद्रेप्रमाणे 'प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता महाराष्ट्र स्वराज्यस्य मुद्रा भद्राय राजते' हा शिलालेख अंकित केलेला आहे.

नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर कमळाच्या फुलामध्ये अशोकचक्र आणि तीन सिंहांचे राष्ट्रीय चिन्ह कोरलेले आहे. त्याभोवती गोलाकार अक्षरांत 'महाराष्ट्र राज्य स्थापना वैशाख ११-१८८२ (भारतीय पंचांग दिनांक) १ मे १९६० (आंतरराष्ट्रीय दिनांक)' असा मजकूर लिहिलेला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापने दिवशी प्रकाशित करण्यात आलेले हे नाणे महाराष्ट्राचे वैभव, छत्रपती शिवरायांची परंपरा आणि भारताचे राष्ट्रीय प्रतीक यांचा सुंदर संगम दर्शवते. आजच्या काळात अशी नाणी अत्यंत दुर्मिळ मानली जातात, आणि त्यातील हे विशेष नाणे शशिकांत मुनोत यांच्या संग्रहात जतन झालेले आहे.













